## || श्री गजानन विजय ग्रंथ ||

## अध्याय एकोणिसावा

|| श्रीगणेशाय नमः || जयजयाजी आनंदकंदा । जयजयादि अभेदा । माझें नमन तुझ्या पदा । असो सर्वदा अनन्यभावें ॥१॥ हे राघवा रघुपती । पाव आतां शीघ्र गती । माझा अंत पहाशी किती ? । हें कांहीं कळेना ॥२॥ खऱ्या थोरांशी कठोरता । नाहीं शोभत अनंता । याचा विचार कांहीं चित्ता । करा आपुल्या ये काळीं ॥३॥ मी दीनवाणें मारितों हांका । मला दगा देऊं नका । हे जगदीशा जगन्नायका । पावा दासगणूस ॥४॥ महाराज असतां शेगांवांत । विप्र एक काशिनाथ । जो खंडेरावाचा होय सुत । गर्दे उपनांव जयाचें ॥५॥ तो आला दर्शना । समर्थांच्या वंदिले चरणां । मूर्ति पाहून त्याच्या मना । आनंद झाला अतिशय ॥६॥ माझ्या सन्माननीय वडिलानें । जीं जीवन्मुक्ताचीं लक्षणें । लिहिलीं अनुभवानें । त्याची प्रत्यक्ष मूर्ति ही ॥७॥ माझें भाग्य धन्य धन्य । म्हणून हें पाहण्या चरण । आलों खामगांवाहून । त्याचें सार्थक झालें कीं ॥८॥ तों समर्थांनीं लीला केली । कोपरखिळी मारिली । काशीनाथाच्या पाठीस भली । आपुल्या परमकृपेनें ॥९॥ जा तुझा हेत पुरला । वाट पाहे तारवाला । भाषणें घोंटाळला । काशिनाथ मानसीं ॥१०॥ म्हणे काम ना माझें ये ठाई । मी न आलों मागण्या कांहीं । तारवाला शिपाई । वाट पहातो काय हें ? ॥११॥ त्याचें गूढ कळेना । पुसण्या छाती होईना । निमुटपणें वंदून चरणा । गेला निघून खामगांवीं ॥१२॥ तों तारवाला शिपाई । उभा दारांत होता पाही । तार घेतली घाई घाई । कशाची ती बघण्यास ॥१३॥ तारेंत हा मजकूर । तुमचा केला तकरुर । मुनसफीच्या हुद्दयावर । मोर्शी तालुक्याकारणें ॥१४॥ तें पाहतां आनंदला । कोपरखिळीचा अर्थ कळला । त्या काशिनाथ पंताला । पहा संतांचें ज्ञान कैसें ? ॥१५॥ असो एकदां नागपुरीं । समर्थांची गेली

स्वारी । गोपाळ बुटीचीया घरीं । त्याच्या अति आग्रहानें ॥१६॥ ही भोसल्याची राजधानी । पूर्वकालीं होती जाणी । त्या शहराची आज दिनीं । दैना झाली विबुध हो ॥१७॥ स्वातंत्र्यरुपी प्राण गेला । खरा धनी याचक ठरला । परक्यांचा बोलबाला । झाला जया शहरांत ॥१८॥ गज घोडे पालख्या अपार । नाहींशा झाल्या साचार । रस्त्यानें फिरे मोटार । अति जोरानें विबुध हो ॥१९॥ असो हा महिमा काळाचा । नाहीं दोष कवणाचा । वाडा गोपाळ बुटीचा । होता सिताबर्डीवर ॥२०॥ त्या भव्य सदनांत । नेऊन ठेविले सद्गुरुनाथ । जैसा वाघ किल्ल्यांत । कोंडोनिया टाकावा ॥२१॥ बुटीचा ऐसा विचार । या ताबर्डीवर । महाराज ठेवावे निरंतर । जाऊं न द्यावें शेगांवा ॥२२॥ अक्रूरानें कृष्णाला । जैसा मथुरेमाजीं नेला । तोच प्रकार येथें झाला । काय वर्णन करावें ? ॥२३॥ शेगांव पडलें भणभणीत । अवघे लोक दुःखित । विनविती हरी पाटलाप्रत । महाराज येथें आणा हो ॥२४॥ कुडीमधून गेला प्राण । कोण पुसे तिजलागून ? । तैसें समर्थांवांचून । शेगांव हें प्रेत पहा ॥२५॥ तुम्ही गांवचे जमेदार । करा याचा विचार । बुटी मोठा सावकार । तेथें न आमुचा लाग लागे ॥२६॥ टक्कर हत्तीहत्तींची । होणें आहे योग्य साची । येथें आम्हांसम कोल्ह्याची । नाहीं मुळीं किंमत॥२७॥ जंबुमाळीसी लढायाला । मारुती हाच योग्य ठरला । जिंकावया कर्णाला । झाली योजना अर्जुनाची ॥२८॥ तुम्हीं नागपुराप्रती जावें । समर्थांसी घेऊन यावें । आम्हां अवघ्यांस सुखवावें । हीच आहे विनंति ॥२९॥ इकडे बुटीच्या घरांत । आजुर्दे राहिले संत । जेवीं हस्तिनापुरांत । कृष्ण नाहीं आनंदला ॥३०॥ महाराज म्हणती बुटीसी । जाऊं दे मज शेगांवासी । या आपुल्या भव्य सदनासी । ठेवून आम्हां घेऊं नको ॥३१॥ तें बुटी मुळींच मानीना । समर्था जाऊं देईना । अनागोंदीचा रामराणा । बुटी वाटे निःसंशय ॥३२॥ बुटी भाविक होता जरी । अहंता नव्हती गेली खरी । श्रीमंतीचा गर्व भारी । त्याच्या ठाई वसतसे ॥३३॥ रोज ब्राह्मणभोजन । समर्थांपुढें सदा भजन । परी शेगांवचे येत जन । बंदी त्या तो करीतसे ॥३४॥ जाऊं न देई दर्शना । शेगांवचे लोकांना । बिगरपरवानगी श्रीमंतसदना । जातां नये कवणासी ॥३५॥ शेगांवचे लोक भले ।


https://santgajananbhaktpariwar.in/

जरी आणावया गेले । परी न कांहीं उपाय चाले । गेले तसेच आले परत ॥३६॥ इकडे भक्त पाटील हरी । कांहीं मंडळी बरोबरी । घेऊन निघाला नागपुरीं । समर्थासी आणावया ॥३७॥ बसला अग्निरथांत । त्याच वेळीं वदले संत । त्या गोपाळबुटीप्रत । येणें रीतीं तें ऐका ॥३८॥ अरे गोपाळा पाटील हरी । निघाला यावया नागपुरीं । तो येण्याच्या आंत परी । मला येथून जाऊं दे ॥३९॥ तो येथें आल्यावर । शांतता नाहीं राहणार । तो पडला जमेदार । याचा विचार करावा ॥४०॥ तुझ्या धनाच्या जोरावरी । उडया या जाण निर्धारी । तो मनगटाच्या बळावरी । नेईल मजला येथून ॥४१॥ हरी पाटील तेथें आला । शिपायानें अटकाव केला । परी तो न त्यानें मानिला । प्रवेश केला सदनांत ॥४२॥ गोपाळ बुटीचिया घरीं । पंगत होती थोर खरी । पाटील आल्याच्या अवसरीं । आले ब्राह्मण भोजना ॥४३॥ ताटें चांदीचीं अवघ्यांस । शिसमचे पाट बसण्यास । होत्या पातळ पदार्थांस । वाटया जवळ चांदीच्या ॥४४॥ नानाविध पक्वान्नें । होतीं भोजनाकारणें । मध्यभागीं आसन त्यानें । मांडिलें समर्थ बसण्यास ॥४५॥ ऐशी बुटीची श्रीमंती । तिचें वर्णन करूं किती ? । ज्याला कुबेर बोलती । लोक नागपूर प्रांतींचा ॥४६॥ असो हरी पाटील सदनांत । आले समर्था नेण्याप्रत । तो महाराज निघाले धांवत । द्वारीं त्यास भेटावया ॥४७॥ वांसरा गाय पाहून । जैसी येई धांवून । तैसें स्वामी गजानन । पाटलासाठीं धांवले ॥४८॥ चाल हरी शेगांवासी । येथें मुळीं न राहणें मसी । तूं आलास न्यावयासी । हें फार बरें झालें ॥४९॥ समर्थ जाऊं लागले । तें गोपाळानें पाहिलें । अनन्यभावें चरण धरिले । समर्थाचे येऊन ॥५०॥ विक्षेप माझा गुरुराया ! । नका करूं या समया । दोन घांस घेऊनियां । इच्छित स्थला मग जावें ॥५१॥ तैसेंच बुटी पाटलासी । बोलूं लागले विनयेंसी । तुम्ही घेऊन प्रसादासी । जावें हेंच मागणें ॥५२॥ येथें न रहाती महाराज । हें समजून आलें आज । पंक्तींत माझी राखा लाज । तुम्हीच पाटील येधवां ॥५३॥ आतांच समर्थ गेले जरी । लोक उपाशी उठतील तरी । आणि अवघ्या नागपुरीं । टीका माझी होईल पहा ॥५४॥ भोजनें होईपर्यंत । महाराज राहिले तेथ । शेगांवची समस्त । मंडळी पंक्तीस

जेवली ॥५५॥ भोजनोत्तर तयारी । निघण्याची ती झाली खरी । दर्शनाची भीड भारी । झाली बुटीच्या वाडयांत ॥५६॥ कुटुंब गोपाळ बुटीचें । जानकाबाई नांवाचें । परम भाविक होते साचें । गृहलक्ष्मीच होती जी ॥५७॥ तिनें केली विनवणी । महाराजांचे चरणीं । माझा हेतु मनींच्या मनीं । बसूं पहातो गुरुराया ! ॥५८॥ तई महाराज बोलले । तुझ्या मना मीं जाणीतलें । ऐसें म्हणून लाविलें । कुंकूं तिच्या कपाळास ॥५९॥ आणखी एक पुत्र तुला । परम सद्गुणी होईल भला । अंतीं जाशील वैकुंठाला । सौभाग्यासह बाळे ! तूं ॥६०॥ ऐसा आशीर्वाद देऊन । निघते झाले दयाघन । त्या सिताबर्डीहून । आले रघूजीच्या घरीं ॥६१॥ हा भोसला राजा रघूजी । उदार मनाचा भक्त गाजी । ज्यानें ठेविला राम राजी । आपुल्या शुद्ध वर्तनें ॥६२॥ त्याचें लौकीकीं राज्य गेलें । जें अशाश्वत होतें भलें । शाश्वत स्वरूपाचें आलें । सद्गुरुभक्तीचें राज्य घरा ॥६३॥ उत्तम प्रकारचा आदर । केला राजानें साचार । त्याचा घेऊन पाहुणचार । रामटेकासी गेले पुढें ॥६४॥ तेथें रामाचें दर्शन । घेऊन आले परतून । शेगांवच्या मठा जाण । हरीपाटलासमवेत ॥६५॥ धार-कल्याणचे रंगनाथ । जे थोर साधु मोंगलाईत । होते ते भेटण्याप्रत । समर्था आले शेगांवीं ॥६६॥ अध्यात्माचीं बोलणीं । सांकेतिक केलीं दोघांनीं । त्याचा भावार्थ जाणण्या कोणी । तेथें नव्हता समर्थ ॥६७॥ श्रीवासुदेवानंद सरस्वती । कर्ममार्गी ज्याची प्रीति । कृष्णातटाका ज्याची महती । माणगांवीं जन्म ज्यांचा ॥६८॥ ते येण्याचे अगोदर । बाळाभाऊस साचार । बोलते झाले गुरुवर । स्वामी गजानन सिद्ध योगी ॥६९॥ अरे बाळा उदयिक । माझा बंधु येतो एक । मजलागीं भेटण्या देख । त्याचा आदर करावा ॥७०॥ तो आहे कर्मठ भारी । म्हणून उद्यां पथांतरीं । चिंध्या न पडूं द्या निर्धारी । अंगण स्वच्छ ठेवा रे ॥७१॥ चिंधी कोठें पडेल जरी । तो कोपेल निर्धारी। जमदग्नीची आहे दुसरी । प्रतिमा त्या स्वामीची ॥७२॥ तो कऱ्हाडा ब्राह्मण । शुचिर्भूत ज्ञानसंपन्न । हें त्याचें कर्मठपण । कवचापरी समजावें ॥७३॥ ऐसें बाळास आदलें दिवशीं । सांगते झाले पुण्यराशी । तों एक प्रहर दिवसासी । स्वामी पातले ते ठायां ॥७४॥ एकमेकांसी पाहतां । दोघे



https://santgajananbhaktpariwar.in/

हंसले तत्त्वतां । हर्ष उभयतांच्या चित्ता । झाला होता अनिवार ॥७५॥ एक कर्माचा सागर । एक योगयोगेश्वर । एक मोगरा सुंदर । एक तरु गुलाबाचा ॥७६॥ एक गंगाभागीरथी । एक गोदा निश्चिती । एक साक्षात् पशुपती । एक शेषशायी नारायण ॥७७॥ स्वामी जेव्हां मठांत आले । तेव्हां गजानन होते बैसले । आपल्या पलंगावरी भले । चिटक्या करानें वाजवीत ॥७८॥ स्वामी येतां चिटकी थांबलि । दृष्टादृष्ट दोघां झाली । तैं स्वामींनीं विचारिली । आज्ञा परत जावया ॥७९॥ फार बरें म्हणून । गजाननें तुकविली मान । स्वामी गेले निघून । बाळास कौतुक वाटलें ॥८०॥ बाळा म्हणे गुरुराया । हें दृश्य पाहूनियां । संशय उपजला चित्ता ठायां । त्याची निवृत्ति करा हो ॥८१॥ त्याचा मार्ग अगदीं भिन्न । तुमच्या ह्या मार्गाहून । ऐसें साच असून । तुमचा बंधु कसा तो ? ॥८२॥ ऐसा प्रश्न ऐकिला । समर्थ देती उत्तर त्याला । बरवा प्रश्न बाळा केला । त्वां हा आज आम्हांतें ॥८३॥ ईश्वराकडे जाण्याचे । तीन मार्ग असती साचे । हे तिन्ही मार्ग ज्ञानाचे । गांवा जाऊन मिळतात ॥८४॥ स्वरुपें त्यांचीं भिन्न भिन्न । दिसतीं पाहणारांकारण । तेणें घोटाळा वरितें मन । पाहाणारांचें राजसा ! ॥८५॥ सोंवळें ओंवळें संध्यास्नान । व्रत उपोषणें अनुष्ठान । या कृत्यांलागून । अंगें म्हणावीं कर्माचीं ॥८६॥ हीं अंगें जो आचरी । निरालसपणें खरीं । तोच समजावा भूवरी । ब्रह्मवेत्ता कर्मठ ॥८७॥ अधिक न्यून येथें होतां । कर्ममार्ग न ये हातां । म्हणून विशेष तत्परता । ठेविली पाहिजे आचरणीं ॥८८॥ येथें एवढीच खबरदारी । घ्यावी लागते जाण खरी । परांकारणें दुरुत्तरीं । कदा त्यानें ताडूं नये ॥८९॥ आतां भक्तिमार्गाचें । ऐक हें लक्षण साचें । भक्तिपंथानें जाणाराचें । मन पाहिजे शुद्ध अती ॥९०॥ मलीनता मनाठायीं । अंशेंही राहिल्या पाही । त्याच्या हातां येत नाहीं । भक्तिरहस्य बापा ! रे ॥९१॥ दया प्रेम लीनता । अंगीं पाहिजे तत्त्वतां । श्रवणीं-पूजनीं आस्था । पाहिजे त्याची विशेष ॥९२॥ मुखामाजीं नामस्मरण । करणें हरीस जाणून । ऐशीं अंगें असतीं जाण । या भक्ति-मार्गाला ॥९३॥ या अंगासह जो भक्ती करी । त्यालाच भेटे श्रीहरी । भक्तिमार्गाची नये सरी । त्याचा विधि सोपा असे ॥९४॥ परी

तो करण्या आचरण । कर्माहून कठीण जाण । जेवीं गगनानें जवळपण । नेत्रालागीं दिसतसे ॥९५॥ आतां योगमार्ग तिसरा । सांगतों मी ऐक खरा । या योगमार्गाचा पसारा । दोघांपेक्षां जास्त असे ॥९६॥ परी हा पसारा निश्चयेंसी । आहे ज्याचा त्याचे पासीं । योगमार्ग साधण्यासी । बाहेरचें न कांहीं लागे ॥९७॥ जेवढें आहे ब्रह्मांडांत । तेवढें आहे पिंडांत । त्या पिंडांतील साहित्य । घेऊन योग साधावा ॥९८॥ आसनें रेचक कुंभक । इडापिंगलेचे भेद देख । धौती मुद्रात्राटक । कळलें पाहिजे मानवां ॥९९॥ कुंडली आणि सुषुम्ना । यांचें ज्ञान पाहिजे जाणा । आधीं योग करणारांना । तरीच तो साधेल ॥१००॥ या तिन्ही मार्गांचें । अंतिम फळ ज्ञान साचें । परी तें ज्ञान प्रेमाचें । *वीण असतां कामा नये ॥१॥ जें जें कृत्य प्रेमावीण । तें तें अवघें आहे शीण । म्हणून प्रेमाचें रक्षण । करणें तिन्ही मार्गांत ॥२॥ काळा गोरा खुजा थोर । कुरुप आणि सुंदर । हे शरीराचे प्रकार । त्याची न बाधा आत्म्यातें ॥३ आत्मा अवघ्यांचा आहे एक । तेथें न पडे कदा फरक । शरीरभेद व्यावहारिक । त्याचें कौतुक कांहीं नसे ॥४॥ तीच या तिन्ही मार्गांची । स्थिति तंतोतंत साची । बाह्य स्वरुपें भिन्न त्यांचीं । परी मूळ कारण एक असे ॥५॥ मुक्कामास गेल्यावर । मार्गाचा न उरे विचार । जो मार्गी चालतो नर । महत्त्व त्याचें त्यास वाटे ॥६॥ पंथ चालण्या आरंभ झाला । परी मुक्कामास नाहीं गेला । अशाचाच होतो भला । तंटा पंथाभिमानानें ॥७॥ या तिन्ही मार्गांचे ते पांथ । मुक्कामीं पोंचल्या होती संत । मग तयांच्या संबंधांत । द्वैत नसे एतुलेंही ॥८॥ वसिष्ठ वामदेव जमदग्नी । अत्री पाराशर शांडिल्य मुनी । हे कर्ममार्गाच्या सेवनीं । मुक्कामासी पोंचले ॥९॥ व्यास, नारद, कयाधू-कुमर । मारुती, शबरी, अक्रूर । उद्धव, सुदामा, पार्थ, विदूर । हे गेले भक्तिमार्गे ॥११०॥ श्रीशंकराचार्य गुरुवर । मच्छिंद्र गोरख जालंदर । हे चढले जिना थोर । या योगमार्गाचा ॥११॥ जो वसिष्ठा लाभ झाला । तोच विदुराच्या पदरीं पडला । तोच मच्छिंद्रानें भोगिला । फळामाजीं फरक नसे ॥१२॥ तीच प्रथा पुढें चालली । येथें न शंका घ्यावी मुळीं । कर्ममार्गाची रक्षिली । बूज श्रीपादवल्लभें ॥१३॥ नरसिंह सरस्वती यतिवर ।

तैसेच झाले साचार । ठिकाण ज्यांचें गाणगापूर । वाडी औदुंबर ख्यात जगीं ॥१४॥ नामा सांवता ज्ञानेश्वर । सेना कान्हु चोखा महार । दामाजीपंत ठाणेदार । गेले भक्तिमार्गानीं ॥१५॥ शेख महंमद श्रीगोंद्यांत । आनंदी स्वामी जालन्यांत । सुर्जी-अंजनगांवांत । देवनाथ चाहाते योगाचे ॥१६॥ तैसेंच आहे सांप्रत । कर्ममार्गी वासुदेव रत । मीं धरला भक्तिपंथ । आणिक बहुता जणांनीं ॥१७॥ पळुसचे धोंडीबुवा । सोनगीरचा नाना बरवा । जालन्याचे यशवंतरावा । भक्तिपंथ साध्य झाला ॥१८॥ खाल्ला आम्मा ती विदेही । तेवीं शिर्डीचे बाबा सांई । गुलाबरावांचे ठायीं । ज्ञानदृष्टि असे रे ॥१९॥ पहा चांदूर तालुक्याचा । वरखेडें नामें ग्रामाचा । आडकूजी नामें संत साचा । गेला याच वाटेनें ॥१२०॥ मुऱ्हा गांवचें संतरत्न । झिंगाजी तो होय जाण । तेवीं नागपूरचे ताजुद्दीन । भक्तिमार्गासी चहाते ॥२१॥ या अवघ्या संतांचें । आचरण भिन्न प्रकारचें । परी अधिकारी कैवल्याचे । ते बसले होउनी ॥२२॥ मार्ग असो कोणताही । त्याचें मुळीं महत्त्व नाहीं । जो मुक्कामास जाई । त्याचें कौतुक करणें असे ॥२३॥ आम्ही हीं भावंडें सारीं । येतें झालों भूमीवरी । कैवल्याच्या मार्गावरी । भाविक आणून सोडावया ॥२४॥ जें ज्याला आवडेल । तिकडे तो जाईल । आणि मोक्षरुपी भोगील फल । त्या त्या पंथा आचरोनी ॥२५॥ आतां नको पुसूंस कांहीं । हें न कोणा सांगे पाही । निवांत बसूं दे ये ठायीं । पिसेंपणाच्या पासोडीनें ॥२६॥ ज्याची निष्ठा बसेल । वा, जो माझा असेल । त्याचेंच कार्य होईल । इतरांची ना जरुर मला ॥२७॥ ज्यासी अनुताप झाला । ब्रह्मज्ञान सांगणें त्याला । उगीच तर्कटी वात्रटाला । स्फोट त्याचा करुं नये ॥२८॥ कोणी कांहीं म्हणोत । आपण असावें निवांत । तरीच भेटे जगन्नाथ । जगद्‌गुरु जगदात्मा ॥२९॥ ऐसा उपदेश ऐकिला । बाळाभाऊच्या नेत्रांला । प्रेमाश्रूंचा लोटला । पूर तो न आवरे त्या ॥१३०॥ अष्टभाव दाटले । शरीरा रोमांच उमटले । वैखरीचें संपलें । काम तेणें सहजची ॥३१॥ मौनेंच केला नमस्कार । श्रीगजानन साधु थोर । वऱ्हाड प्रांताचा उद्धार । करावयासी अवतरला ॥३२॥ साळुबाई नांवाची । एक असे कण्व शाखेची । ती होती महाराजांची । मनापासून भक्तीण

॥३३॥ तिला महाराज एके दिनीं। ऐशा परी वदले वाणी। डाळपीठ घेऊनी। स्वैंपाक करी अहोरात्र ॥३४॥ जे येतील तयांना। साळु घाल भोजना। येणेंच तूं नारायणा। प्रिय होशील निःसंशय ॥३५॥ ती साळुबाई मठांत। आहे अझूनपर्यंत। जी वैजापूरची असे सत्य। माहेर वाडेंघोडें जिचें ॥३६॥ प्रल्हादबुवा जोशाला। होता कृपेचा योग आला। तो न तया फलद झाला। तयाचिया दुर्दैवें ॥३७॥ खामगांवच्या सान्निध्यासी। जलंब गांव परियेसीं। त्या गांवचा रहिवासी। तुळसीराम एक असे ॥३८॥ पुत्र हा तुळसीरामाचा। आत्माराम नांवाचा। होता तैलबुद्धीचा। वेदाध्ययनीं प्रेम ज्याचें ॥३९॥ या धर्मपीठ वाराणसी। जी भागीरथीच्या तटा काशी। तेथें गेला अध्ययनासी। वेदवेदांग स्मृतीच्या ॥१४०॥ प्रत्यहीं भागीरथीचें स्नान। माधुकरीचें सेवी अन्न। गुरुगृहातें जाऊन। करी अध्ययन श्रुतीचें ॥४१॥ श्रोते विद्यार्थी ना तरी। अध्ययना जाती देशावरी। शिकण्याऐवजीं परोपरी। करुं लागती चैन ते ॥४२॥ चैनीमाजीं गुंतल्या मन। मग कशाचें अध्ययन ?। बिरुड आंब्यालागून। लागतां नास रसाचा ॥४३॥ आत्माराम नव्हता यापरी। विवेकसंपन्न सदाचारी। विद्या अवघी करुन पुरी। आला निजदेशातें ॥४४॥ स्वदेशीं येतां शेगांवासी। गेला असे अति हर्षी। हजिरी ती द्यावयासी। श्रीगजानन महाराजा ॥४५॥ तो वेद विद्येचा जाणता। गजानन केवळ ज्ञानसविता। आत्माराम वेद म्हणतां। कोठें कोठें चुकतसे ॥४६॥ त्या चुकीची दुरुस्ती। करुं लागले सदगुरुमूर्ती। आत्मारामाचे संगतीं। वेद म्हणती महाराज ॥४७॥ ऐकतां त्यांचें वेदाध्ययन। तन्मय होती विद्वान। न होय सराफावांचून। किंमत त्या हिऱ्याची ॥४८॥ शेवटीं समर्थांचेपाशीं। आत्माराम राहिला आदरेंसी। मधु टाकूनी मक्षिकेसी। जाणें कैसें आवडेल ? ॥४९॥ प्रत्यहीं सेवेकारण। यावें त्यानें जलंबाहून। चुकविला ना एकही दिन। ऐसा एकनिष्ठ भक्त तो ॥१५०॥ समर्थांच्या पश्चात। हाच होता मठांत। पूजा अर्चा करण्याप्रत। सद्गुरुच्या समाधीची ॥५१॥ मोबदला न घेतां भली। एकनिष्ठ सेवा केली। शेवटीं त्यानेंच अर्पिली। इस्टेट आपली महाराजा ॥५२॥ इस्टेट अल्प साचार। एक जमीन एक घर।

येथें न दृष्टि किंमतीवर । देणें आहे भाग पहा ॥७३॥ भिल्लिणीनें रामाला । बोरें देऊन वश केला । तैसाच प्रकार हाही झाला । म्हणून केलें वर्णन ॥७४॥ स्वामी दत्तात्रय केदार । दुसरा नारायण जामकर । निवळ दुधाचा ज्यांचा आहार । तो दुधाहारी बुवा ॥७५॥ ऐसे श्रोते तिघेजण । स्वामीचे भक्त निर्वाण । ज्यांनीं आपुलें तनमन । समर्थचरणीं अर्पिलें ॥७६॥ मोरगांव भाकरे नांवाचा । गांव बाळापूर तालुक्याचा । तेथील मारुतीपंत पटवाऱ्याचा । वृत्तान्त ऐका थोडासा ॥७७॥ श्रोते ! त्या मोरगांवांत । मारुतीपंताच्या शेतांत । पिकाचें रक्षण करण्याप्रत । तिमाजीनामें माळी होता ॥७८॥ तो माळी खळ्याभीतरीं । निजला निशीच्या अवसरीं । गाढ झोंप लागली खरी । ते अवसरीं तयाला ॥७९॥ उलटून गेले दोन प्रहर । कुंभाराचे दहावीस खर । खळ्यांत येऊनी दाण्यावर । पडले असती पांडयाच्या ॥६०॥ राखणदार झोंपीं गेला । गर्दभासी आनंद झाला । ते खाऊं लागले जोंधळ्याला । राशींत तोंड घालूनी ॥६१॥ हा पांडया मारुतीपंत । महाराजांचा होता भक्त । म्हणून सद्गुरुरायाप्रत । लीला करणें भाग आलें ॥६२॥ क्षणांत जाऊनी मोरगांवासी । हांक मारिली तिमाजीसी । अरे ! जागा होई त्वरेंसी । रासेसी गाढवें पडलीं ना ॥६३॥ ऐसें मोठयानें बोलून । तिमाजीस जागे करुन । महाराज पावले अंतर्धान । खळ्यामधून तेधवां ॥६४॥ तिमाजी उठून पाहतां । गाढवें दिसलीं तत्त्वतां । म्हणे काय करुं आतां । मालक रागे भरेल कीं ॥६५॥ पिकाचें रक्षण करण्यासाठी । त्यानें ठेविलें आहे मसी । विश्वासघात आज दिशीं । झाला त्याच्या माझ्या हातें ॥६६॥ तो विश्वासला माझ्यावर । मी निजता झालों निसूर । रास ही निम्यावर । खाऊन टाकली गाढवांनीं ॥६७॥ आतां समजूत मालकाची । कोण्या रीतीं घालूं साची । पहा त्या वेळीं इमानाची । किंमत होती लोकांस ॥६८॥ ना तरी हल्लींचे नोकर । निमकहराम शिरजोर । नफातोटयाची तिळभर । काळजी न त्यांना मालकाच्या ॥६९॥ तिमाजी तैसा नव्हता । हळहळ लागली त्याच्या चित्ता । म्हणे काय जाऊन सांगूं आतां । मी पांडयाकारणें ॥१७०॥ कांहीं असो चुकीची । माफी मागितली पाहिजे साची । उदार बुद्धि

मारुतीची । आहे तो क्षमाच करील ॥७१॥ ऐसें मनाशीं बोलून । उदयास येतां नारायण । तिमाजी गांवांत येऊन । पाय धरी पंताचे ॥७२॥ महाराज माझ्या झोंपेनीं । बुडविलें तुम्हांलागूनी । दहावीस गांढवांनीं । येऊन रास खाल्ली कीं ॥७३॥ ती नुकसान किती झाली । ती पाहिजे पाहिली । खळ्यामाजीं जाऊनि भली । म्हणजे मज वाटेल बरें ॥७४॥ मारुती म्हणाले त्यावर । खळ्यांत यावया साचार । वेळ ना मला तिळभर । मी निघालों शेगांवा ॥७५॥ दर्शन घेऊन सद्‌गुरुचें । त्या गजानन महाराजांचें । उद्यां सकाळीं धान्याचें । काय झालें तें पाहीन ॥७६॥ ऐसें बोलून शेगांवाला । मारुतीपंत येतां झाला । दर्शनासाठीं मठांत गेला । दहा अकराचे सुमारास ॥७७॥ महाराज होते असनावरी । जगू पाटील समोरी । बाळाभाऊ बद्ध करीं । बसला जवळ पाटलाच्या ॥७८॥ मारुतीनें दर्शन । घेतां केलें हास्य वदन । तुझ्यासाठीं मजकारण । त्रास झाला रात्रीसी ॥७९॥ तुम्ही माझे भक्त होतां । मला राबण्या लावितां । झोंपाळू नोकर ठेवितां । आणि आपण निजतां खुशाल घरीं ॥१८०॥ मारुती काल रात्रीला । खळ्यांत तिमाजी झोंपीं गेला । गाढवांचा सुळसुळाट झाला । ते रास भक्षूं लागले ॥८१॥ म्हणून मी जागें केलें । जाऊन तिमाजीसी भले । रास सांभाळण्या सांगितलें । आणि आलों निघून ॥८२॥ ऐसी खूण पटतांक्षणीं । मारुतीनें जोडून पाणी । मस्तक ठेवूनियां चरणीं । ऐसें वचन बोलला ॥८३॥ आम्हां सर्वस्वीं आधार । आपुलाच आहे साचार । लेंकराचा अवघा भार । मातेचिया शिरीं असे ॥८४॥ आमुचें म्हणून जें जें कांहीं । तें अवघेंच आहे आपुलें आई ! । सत्ता त्यावरी नाहीं । तुम्हांवीण कवणाची ॥८५॥ खळें आणि जोंधळा । अवघाची आहे आपला । तिमाजी नोकर नांवाला । व्यवहारदृष्टीं आहे कीं ॥८६॥ ब्रह्मांडाचें संरक्षण । आपण करितां येथून । लेंकरासाठीं त्रास पूर्ण । माता सोसी वरच्यावरी ॥८७॥ मी लेंकरुं आपुलें । म्हणूनियां आपण केलें । खळ्यांत तें जाऊन भलें । मोरगांवीं संरक्षण ॥८८॥ ऐसीच कृपा निरंतर । स्वामी असावी माझ्यावर । आतांच जाऊन करितों दूर । नोकरीवरुन तिमाजीला ॥८९॥ ऐसें बोलतां मारुती । कौतुक वाटलें समर्थांप्रती । आणि भाषण

केलें येणें रीतीं। तें आतां अवधारा ॥१९०॥ छे ! छे ! वेडया ! तिमाजीस। नको मुळींच काढूंस। नोकरीवरुन खास। त्याचें वर्म सांगतों तुला ॥९१॥ तिमाजी नोकर इमानी। खळ्यांत गाढवें पाहूनी। दुःखी झाला असें मनीं। तें म्यां तेव्हांच जाणिलें ॥९२॥ रात्रीची हकीकत। तुला सांगावया प्रत। आला होता भीत भीत। सकाळीं ना तुजकडे ॥९३॥ तैं तूं म्हणालास त्याला। मी जातों आहे शेगांवाला। उद्यां सकाळीं खळ्याला। येऊनियां पाहीन ॥९४॥ ऐसें गुरुवचन ऐकिलें। मारुतीसी चोज जहालें। पहा संतांचें कर्तृत्व भलें। कैसें आहे अगाध ॥९५॥ गाढवें खळ्यांत पडलेलीं। कोणीं न त्या सांगितलीं। तीं अंतर्ज्ञानें जाणिलीं। गजाननानें श्रोते हो ॥९६॥ शके अठराशें सोळासी। महाराज बाळापुरासी। असतां गोष्ट झाली ऐसी। ती थोडकी सांगतों ॥९७॥ तेथें सुखलाल बन्सीलालाची। एक बैठक होती साची। त्या बैठकीसमोर महाराजांची। स्वारी बैसली आनंदांत ॥९८॥ मूर्ति अवघी दिगंबर। वस्त्र नव्हतें तिळभर। त्या पाहून भाविक नर। नमन करुन जात होते ॥९९॥ तो होता हमरस्ता। बाजार पेठेचा तत्त्वतां। त्या पंथानें जात होता। एक पोलिस हवालदार ॥२००॥ नांव त्या हवालदाराचें। नारायण आसराजी होतें साचें। समर्था पाहून डोकें त्याचें। फिरुन गेलें तात्काळ ॥१॥ तो म्हणे हा नंगा धोत। मुद्दाम बसला पंथांत। साधू ना हा भोंदू सत्य। त्याची उपेक्षा न करणें बरी ॥२॥ ऐसें बोलून जवळीं गेला। अद्वातद्वां बोलूं लागला। लाज कैसी नाहीं तुजला। नंगा बसतोस रस्त्यावरी ॥३॥ हे घे त्याचें प्रायश्चित्त। तुला मी देतों आज येथ। ऐसें बोलून स्वामीप्रत। मारुं लागला छडीनें ॥४॥ वळ पाठ पोटावरी। उठते झाले निर्धारी। परी ना हवालदार आवरी। मारतां हात आपुला ॥५॥ ऐसें तेधवां पाहून। एक गृहस्थ आला धांवून। आपुल्या दुकानामधून। हुंडीवाला नाम ज्याचें ॥६॥ तो म्हणे हे हवालदार। तूं विचार कांहीं कर। उगेंच सत्पुरुषावर। हात टाकणें बरें नव्हे ॥७॥ कां कीं, संतांचा कैवारी। एक आहे श्रीहरी। वळ त्यांच्या पाठीवरी। उठले ते कां न दिसले तुला ॥८॥ या कृत्यानें तुझा अंत। जवळीं आला अत्यंत। आजारीच मोडितो पथ्य। मरावया कारणें ॥९॥ तेंच तूं आज

केलें । हें न कांहीं बरें झालें । अजून तरी उघडी डोळे । माफि माग गुन्ह्याची ॥२१०॥ हवालदार म्हणे माफीचें । कारण मसीं न मागण्याचें । कावळ्याचे शापें साचें । काय ढोरें मरतील ! ॥११॥ हा नंगा धोत हलकट । बसला पाहून बाजारपेठ । तोंडानें गोष्टी चावट । अचाट ऐसा करीत हा ॥१२॥ ऐशा ढोंग्याला मारणें । ईश्वर जरी मानील गुन्हे । तरी मग न्याया कारणें । जागाच नाहीं राहिली ॥१३॥ तेंच पुढें सत्य झालें । हवालदार पंचत्व पावले । त्या बाळापूर नगरींत भले । आपण केलेल्या कृत्यानें ॥१४॥ एका पंधरवडयांत । हवालदाराचे अवघे आप्त । होते झाले भस्मीभूत । एका साधूस मारल्यानें ॥१५॥ म्हणून अवघ्या लोकांनीं । साधूसमोर जपूनी । वागावें प्रत्येकानीं । खरें कळेपर्यंत ॥१६॥ नगर जिल्ह्यांत संगमनेर । प्रवदा नदीचे कांठावर । गांव अति टुमदार । त्याचें वर्णन करवेना ॥१७॥ अनंतफंदी नांवाचा । कवि जेथें झाला साचा । तेथील हरी जाखडयाचा । ऐका तुम्ही वृत्तान्त हा ॥१८॥ हा हरी जाखडी माध्यंदिन । होता यजुर्वेदी ब्राह्मण । गांवोगांव फिरुन । पोट आपुलें भरीतसे ॥१९॥ तो फिरत फिरत शेगांवासी । आला समर्थ दर्शनासी । बसतां झाला पायापासीं । श्रीगजानन स्वामींच्या ॥२२०॥ तों हजारों घेती दर्शन । कोणी ब्राह्मणभोजन । कोणी खडीसाखर वांटून । नवस केलेला फेडिती ॥२१॥ तई हरी म्हणे चित्तासी । हा केवढा ज्ञानरासी । येऊनियां पायापासीं । विन्मुख जाणें भाग मला ॥२२॥ कां कीं दैव खडतर । माझें आहे साचार। निवळ पर्वत खडकावर । हरळ उगवेल कोठोनी ? ॥२३॥ आज अन्न मिळालें । उद्यांचें कोणीं पाहिलें । ऐसें करीत संपले । दिवस माझे आजवर ॥२४॥ संग्रहासी नाहीं धन । शेतवाडा मळा जाण । मी ना मुळींच विद्वान । मला कन्या कोण देईल ? ॥२५॥ हे स्वामी गजानना ! । सच्चिदानंदा दयाघना ! । संसारसुखाची वासना । जहालीं मनीं बलवत्तर ॥२६॥ ती तूं पूर्ण करावी । मुलें लेंकरें मला व्हावी । प्रथम बायको मिळावी । कुलीन आज्ञाधारक ॥२७॥ ऐसें जो इच्छी मनांत । तोंच त्याच्या अंगावर्त । थुंकते झाले सद्‌गुरुनाथ । इच्छेस त्याच्या जाणूनी ॥२८॥ या हरी जाखडयानें । बावंच्या मागला मजकारणें ।

म्हणून आले थुंकणें । या मूर्खांच्या अंगावर ॥२९॥ संसारापासून सुटावया । लोक भजती माझ्या पाया । यानें येथें येऊनियां । संसारसुख मागितलें ॥२३०॥ पहा जगाची रीत कैसी । अवघेच इच्छिती संसारासी । सच्चिदानंद श्रीहरीसी । पहाण्या न कोणी तयार ॥३१॥ ऐसें आपणासी बोलले । पुन्हां जाखडयासी पाहिलें । जें जें तूं इच्छिलें । सांप्रतकालीं मनांत ॥३२॥ तें तें अवघें होईल पूर्ण । पुत्रपौत्र तुजलागून । होतील संग्रहासी धन । तेंही थोडकें राहील ॥३३॥ जा आतां परत घरा । सुखें करी संसारा । करीत असावा परमेश्वर । आठव वेडया ! विसरुं नको ॥३४॥ ऐसें तयासी बोलून । प्रसाद म्हणून थोडकें धन । दिलें हरी जाखडयाकारण । लग्न स्वतःचें करावया ॥३५॥ हरी जाखडया संगमनेरीं । सुखी जहाला संसारीं । महाराजाची वाणी खरी । ती कोठून खोटी होईल ॥३६॥ ऐसाच एक निमोणकर । गोविंदाचा कुमार । रामचंद्र नामें साचार । ओव्हरसियरच्या हुद्यावरी ॥३७॥ बेंद्रे वासुदेव सर्व्हेअर । होता त्याच्या बरोबर । तो आणि निमोणकर । आले मुकना नदीवरी ॥३८॥ हा मुकना नाला डोंगरांत । आहे सह्याद्री पर्वतांत । इगतपुरी तालुक्यांत । बुध हो ! नासिक जिल्ह्याच्या ॥३९॥ वनश्री ती रमणीय अती । तिचें वर्णन करुं किती । हरीण बालकें बागडती । निर्भयपणें काननांत ॥२४०॥ फलभारें तरुवर । वांकले असती अपार । वन्य पशु फिरती स्वैर । बिब्बट लांडगे ते ठायां ॥४१॥ असो या मुकन्या नाल्यापासीं । जवळ एका खोऱ्यासी । एका जलाच्या प्रवाहासी । कपीलधारा नाम असे ॥४२॥ तेथें प्रत्येक पर्वणीस । भाविक येती स्नानास । लौकिक याचा आसपास । तीर्थ म्हणून पसरलासे ॥४३॥ असो एक्या पर्वणीसी । निमोणकर गेले स्नानासी । योगाभ्यास थोडा यासी । येत होता विबुध हो ॥४४॥ तो पूर्ण व्हावा म्हणून । इच्छित होतें त्याचें मन । गोसावी बैराग्यालागून । पुसूं लागला तेथल्या ॥४५॥ नाहीं नाहीं माहीत मात । ऐकूं येई सर्वत्र । तेणें निमोणकर चित्तांत । हताश पूर्ण जहाला ॥४६॥ काय करुं देवा आतां । मला योगाभ्यास शिकवितां । कोठें भेटेल तत्त्वतां । ती कृपा करुन सांगणें ॥४७॥ तो कपीलधारेवरी । एक पुरुष देखिला अधिकारी । ज्याचे हात

गुडघ्यावरी । येऊन सहज लागले ॥४८॥ उंच बांधा मुद्रा शांत । बैसला होता ध्यानस्त । त्यास घातले दंडवत । निमोणकरानें अष्टांगेंसी ॥४९॥ बराच वेळ झाला जरी । योगी न कांहीं बोले परी । अस्तमानाची वेळ खरी । समीप येऊं लागली हो ॥२५०॥ पोटीं ना अन्न तिळभर । बिऱ्हाड राहिलें बहु दूर । कपीलधारेचें धरुन नीर । तुंब्यांत गोसावी निघाले ॥५१॥ तैं निमोणकर म्हणे समर्था ! । अंत माझा किती पहातां । ठाऊक असल्या योगगाथा । मशीं कांहीं शिकवा हो ॥५२॥ तो अखेर अस्तमानीं । बोलते झाले कैवल्यदानी । हा चित्रपट घेऊनी । जा आपुलें काम करी ॥५३॥ षोडाक्षरी त्यावर । मंत्र लिहिला आहे थोर । त्याचा वाणीनें निरंतर । जप आपुला करावा ॥५४॥ मंत्रप्रभावें थोडा बहुत । योग येईल तुजप्रत । योगमार्ग हा अत्यंत । कठीण सर्व योगामध्यें ॥५५॥ गोगलगाय शेप किडा । हिमालया न देईल वेढा ! । सागरीचा सिंप किडा । मेरु पर्वता न जाय कधीं ॥५६॥ नेटाचा केला यत्न । ब्रह्मचर्य संभाळून । येतील दहापांच आसन । धौती नौती केल्यावरी ॥५७॥ जा पुढें न विचारी मला । हा घे देतों प्रसाद तुला । ऐसें बोलून उचलिला । एक तांबडा खडा करें ॥५८॥ तो देऊनियां मजसी । गुप्त झालें पुण्यरासी । तेंच पुढें नाशिकासी । गंगेवरी भेटले त्या ॥५९॥ त्या पाहून निमोणक्र । गेले धांवत साचार । शिर ठेवून पायांवर । प्रश्न त्यांसी ऐसा केला ॥२६०॥ महाराज माझा कंटाळा । कां हो ! आपणच कां केला । आपुल्या नांव गांवाला । न सांगतां गेलाच कीं ॥६१॥ महाराज डोळे वटारुन । बोलते झाले त्याकारण । तांबडा खडा देऊन । नांव माझें कथिलें म्या ॥६२॥ नर्मदेचा गणपती । तांबडा असतो निश्चिती । तूं मूळचाच मूढ मती । रहस्य त्याचें न जाणिलें ॥६३॥ म्हणून त्याचें गूढ तुला । पडतें झालें जाण मुला ! । मी रहातों शेगांवाला । गजानन हें नांव माझें ॥६४॥ धुमाळ सदनापर्यंत । चाल माझ्या समवेत । पुन्हां भेटी तुजप्रत । होईल माझी ते ठायां ॥६५॥ ऐसें बोलूनी निघाले । महाराज रस्त्यांत गुप्त झाले । भिरभिरीं पाहूं लागले । चहूंकडे निमोणकर ॥६६॥ कंटाळून अखेरी । धुमाळाच्या आले घरीं । तों गजानन महाराज ओसरीवरी । बसले ऐसें पाहिले ॥६७॥ मौनेंच करुन

वंदन । कथिलें धुमाळाकारण । कपीलधारेपासून । जें कां झालें इथवरी ॥६८॥ तें ऐकून धुमाळाला । अतिशय आनंद जहाला । तो म्हणे योगीराजाला । वाण कशाची सांग मज ॥६९॥ हे अवघ्या सामर्थ्याची । खाण निःसंशय आहेत साची । सार्वभौमपदाची । त्याच्या पुढें न किंमत ॥२७०॥ जो तांबडा खडा तुसी । दिला तो ठेवून पाटासी । करणें पूजा-अर्चेसी । सद्भावें निरंतर ॥७१॥ योगाभ्यास ही समोरी । त्या खडयाच्या आदरें करी । त्याच्या कृपेनें कांहीं तरी । योगाभ्यास येईल ॥७२॥ तेंच पुढें झालें सत्य । योगाभ्यास थोडा बहुत । आला निमोणकराप्रत । श्रीगजाननकृपेनें ॥७३॥ एक शेगांवचा रहिवासी । तुकाराम कोकाटे परियेसीं । त्याची संतति यमसदनासी । जाऊं लागली उपजतांच ॥७४॥ म्हणून त्यानें समर्थाला । एकदां नवस ऐसा केला । जरी देशील संततीला । दीर्घायुषी गुरुराया ॥७५॥ तरी एक मुलगा त्यांतून । तुसी करीन अर्पण । मनोरथ त्याचे पूर्ण । केले गजाननस्वामीनें ॥७६॥ दोन तीन मुलें झालीं । परी नवसाची न राहिली । आठवण तुकारामा भली । संततीच्या मोहानें ॥७७॥ तो थोरला मुलगा नारायण । रोग झाला त्याकारण । औषधोपचार केले जाण । परी न आला गुण कांहीं ॥७८॥ नाडी बंद होऊं लागली । नेत्रांची ती दृष्टि थिजली । धुगधुगी मात्र उरली । होती त्याच्या छातीला ॥७९॥ ती स्थिति पाहून । तुकारामा झाली आठवण । नवस केल्याची ती जाण । एकदम त्या समयाला ॥२८०॥ तुकाराम म्हणे गुरुराया । हा पुत्र माझा वांचलिया । अर्पण करीन सदया । सेवा तुमची करण्यास ॥८१॥ ऐसा वचनबद्ध होतांक्षणीं । नाडी आली ठिकाणीं । हळूहळू नेत्र उघडोनी । पाहूं लागला बाल तो ॥८२॥ व्याधि बरी झाल्यावर । तो नारायण-कुमार । आणून सोडला मठावर । नवस आपला फेडावया ॥८३॥ तो नारायण अझूनी । आहे तया ठिकाणीं । बोलिलेला नवस कोणी । महाराजांचा चुकवूं नये ॥८४॥ हेंच सांगण्या लोकांप्रत । नारायण आहे जिवंत । शेगांवीं त्या मठांत । संत-चरित्र ना कादंबरी ॥८५॥ असो पुढें आषाढमासीं । महाराज गेले पंढरीसी । घेऊन हरीपाटलासी । विठ्ठलासी भेटावया ॥८६॥ जो सर्व संतांचा । ध्येयविषय साचा । जो कल्पतरु भक्तांचा । कमलनाभ

सर्वेश्वर ॥८७॥ जो जगदाधार जगत्पति । वेद ज्याचे गुण गाती । जो संतांच्या वसे चित्तीं । रुक्मिणीपती दयाघन ॥८८॥ पंढरीस आले गजानन । चंद्रभागेचें केलें स्नान । गेलें घ्याया दर्शन । पांडुरंगाचें राउळीं ॥८९॥ हे देवा पंढरीनाथा । हे अचिंत्या अद्वया समर्था । हे भक्तपरेशा रुक्मिणीकांता । ऐक माझी विनवणी ॥२९०॥ तुझ्या आज्ञेनें आजवर । भ्रमण केलें भूमिवर । जे जे भाविक होते नर । त्यांचे मनोरथ पूर्ण केले ॥९१॥ आतां अवतार-कार्य संपलें । हें तूं जाणसी वहिलें । पुंडलीक वरदा विठ्ठले । जाया आज्ञा असावी ॥९२॥ देवा, मी भाद्रपद मासीं । जावया इच्छितों वैकुंठासी । अक्षय्यीचे रहावयासी । तुझ्या चरणांसन्निध ॥९३॥ ऐसी करुन विनवणी । समर्थांनीं जोडिले पाणी । अश्रु आले लोचनीं । विरह हरीचा साहवेना ॥९४॥ हरी पाटील जोडून हातां । पुसूं लागला पुण्यवंता । अश्रु कां हो सद्गुरुनाथा । आणिले लोचनीं ये वेळां ? ॥९५॥ किंवा मी कांहीं सेवेला । चुकलों आहे दयाळा । म्हणून आपणां खेद झाला । तें सांगा लवलाही ॥९६॥ महाराज म्हणाले त्यावर । हरी पाटलाचा धरुन कर । सांगितलें तरी न कळणार । त्याचें वर्म बापा तुला ॥९७॥ तो विषय खोल भारी । तूं न पडावें त्याभीतरीं । इतकेंच सांगतों श्रवण करी । संगत माझी थोडी असे ॥९८॥ चाल आतां शेगांवाला । तूं आपल्या ठिकाणाला । तुमच्या पाटील वंशाला । कांहीं न कमी पडेल ॥९९॥ पंढरीचें मावंदें केलें । शेगांवामाजीं भलें । चित्त चिंतेनें व्याप्त झालें । मात्र हरीपाटलाचें ॥३००॥ तो म्हणे मंडळीस । महाराज वदले पंढरीस । संगत राहिली थोडे दिवस । माझी विठूच्या राउळीं ॥१॥ पुढें श्रावणमास गेला । क्षीणता आली तनूला । पुढें भाद्रपदमास आला । काय झालें तें ऐका ॥२॥ गणेश चतुर्थीचे दिवशीं । महाराज म्हणाले अवघ्यांसी । आतां गणपती बोळवण्यासी । यावें तुम्हीं मठांत ॥३॥ कथा गणेशपुराणांत । ऐशापरी आहे ग्रथित । चतुर्थीच्या निमित्त । पार्थिव गणपती करावा ॥४॥ त्याची पूजा-अर्चा करुन । नैवेद्य करावा समर्पण । दुसरे दिवशीं विसर्जून । बोळवावा जलामध्यें ॥५॥ तो दिवस आज आला । तो साजरा पाहिजे केला । या पार्थिव देहाला । तुम्ही बोळवा आनंदें ॥६॥ दुःख न करावें

यत्किंचित । आम्हीं आहों येथें स्थित । तुम्हां सांभाळण्याप्रती सत्य । तुमचा विसर पडणें नसे ॥७॥ हें शरीर वस्त्रापरी । बदलणें आहे निर्धारी। ऐसें गीताशास्त्रांतरीं । भगवान् वदला अर्जुना ॥८॥ जे जे ब्रह्मवेत्ते झाले । त्यांनीं त्यांनीं ऐसेंच केले । शरीरवस्त्रासी बदलिलें । हें कांहीं विसरुं नका ॥९॥ चतुर्थीचा अवघा दिवस । आनंदामाजीं काढिला खास । बाळाभाऊच्या धरिलें करास । आसनीं आपल्या बसविलें ॥३१०॥ मी गेलों ऐसें मानूं नका । भक्तींत अंतर करुं नका । कदा मजलागीं विसरुं नका । मी आहे येथेंच ॥११॥ ऐसें भाषण करुन । योगें रोधिला असे प्राण । दिला मस्तकीं ठेवून । त्या महात्म्या पुरुषानें ॥१२॥ शके अठराशें बत्तीस । साधारण नाम संवत्सरास । भाद्रपद शुद्ध पंचमीस । गुरुवारीं प्रहर दिवसाला ॥१३॥ प्राण रोधिता शब्द केला । 'जय गजानन' ऐसा भला । सच्चिदानंदीं लीन झाला । शेगांवामाझारीं ॥१४॥ देहाचें तें चलनवलन । पार गेलें मावळोन । स्वामी समाधिस्त पाहून । लोक हळूहळूं लागले ॥१५॥ पुकार झाली गांवांत । स्वामी झाले समाधिस्थ । ऐसी ऐकतां मात । हृदय पिटती नारीनर ॥१६॥ गेला गेला साक्षात्कारी । चालता बोलता श्रीहरी । गेला गेला कैवारी । आज दीनजनांचा ॥१७॥ गेला आमुचा विसांवा । गेला आमुचा सौख्यठेवा । विझाला हा ज्ञानदिवा । कालरुपी वाऱ्यानें ॥१८॥ अहो गजाननस्वामी समर्था ! । आतां आम्हांस कोण त्राता ? । कां रे इतक्यांत पुण्यवंता । गेलास आम्हां सोडून ? ॥१९॥ मार्तंड पाटील, हरी पाटील । विष्णुसा बंकटलाल । ताराचंद प्रेमळ । भक्त स्वामीचा जो असे ॥३२०॥ श्रीपतराव कुळकर्णी । मठामाजीं जमले जाणी । विचार केला अवघ्यांनीं । ऐशा रीतीं श्रोते हो ॥२१॥ आज आहे पंचमीचा दिवस । समाधि न द्या स्वामीस । हाळोपाळीच्या लोकांस । येऊं द्या हो दर्शना ॥२२॥ आतां पुढें ही मूर्ति । लोपणार आहे निश्चिती । अस्तमानापर्यंत ती । लोकांची ती वाट पहा ॥२३॥ ज्यांच्या नशिबीं असेल । तयांना दर्शन घडेल । नका करुं आतां वेळ । जासूद धाडा चोहींकडे ॥२४॥ गोविंदशास्त्री डोणगांवचे। एक विद्वान् होते साचे। ते बोलिले आपुल्या वाचें । सर्व लोकांस येणें रीतीं ॥२५॥ त्यांच्या आवडत्या

भक्तांसी । ते दर्शन देतील निश्चयेंसी । तोंपर्यंत प्राणासी । मस्तकीं धारण करतील ॥२६॥ त्याची प्रचीति पहावया । नको कोठें लांब जाया । पहा लोणी ठेवोनियां। येधवां मस्तकीं स्वामीच्या ॥२७॥ लोणी ठेवितां शिरावरी । तें पघळूं लागलें निर्धारीं । जो तो त्याचें कौतुक करी । बल हें योगशास्त्राचें ॥२८॥ तो प्रकार पहातां । गोविंदशास्त्री झाला बोलता । एक दिवसाची काय कथा । हे राहतील वर्षभर ॥२९॥ निःसंशय ऐशा स्थितींत । परी हें करणें अनुचित । आवडते अवघे आलिया भक्त । समाधि द्या स्वामीला ॥३०॥ तें अवघ्यांस मानवलें । स्वामीपुढें आदरें भलें । भजन त्यांनीं मांडिलें । हजार टाळ जमला हो ॥३१॥ दुरदूरच्या भक्तांप्रत । स्वामी जाऊन स्वप्नांत । आपुल्या समाधीची मात । कळविते झाले विबुध हो ॥३२॥ तया ऋषिपंचमीला । अपार मेळा मिळाला । लोकांचा तो शेगांवाला । घ्याया दर्शन स्वामीचें ॥३३॥ रथ केला तयार । दिंड्या आल्या अपार । सडे घातले रस्त्यावर । गोमयाचे बायांनी ॥३४॥ रंगवल्या नानापरी । काढू लागल्या चतुर नारी । दीपोत्सव झाला भारी । त्या शेगावग्रामाला ॥३५॥ मूर्ति ठेविली रथात । मिरवणूक निघाली आनंदात । रात्रभरी शेगावात । तो ना थाट वर्णाचे ॥३६॥ वाद्यांचे नाना प्रकार । दिंड्या मिळाल्या अपार । होऊं लागला भगनगजर । विठ्ठलाच्या नावाचा ॥३७॥ तुळशी बुक्का गुलाल फुले । भक्त उधळू लागले । फूलांखाली झाकून गेले । श्री गजानन महाराज ॥३८॥ बर्फीपेढ्यांस नाही मिती । लोक वाटती खिरापती । कित्येकांनी रथावरती । रूपये पैसे उधळीले ॥३९॥ ऐशी मिरवणूक रात्रभर । शेगावी निघून अखेर । उदयास येता दिनकर । परत आली मठात ॥४०॥ समाधीच्या जागेवरी । मूर्ती नेऊनी ठेविली खरी । रूद्राभिषेक केला वरी । अखेरचा देहाला ॥४१॥ पूजा केली पंचोपचार । आरती उजळली अखेर । भक्तांनी केला नामगजर । गजाननाचे नावाचा ॥४२॥ जय जय अवलीया गजानना! । हे नरदेहधारी नारायणा । अविनाशरूपा आनंदघना । परात्परा जगत्पते ॥४३॥ ऐशा भजनाभीतरी । मूर्ति ठेविली आसनावरी । उत्तराभिमुख साजिरी । शास्त्रमार्गाप्रमाणे ॥४४॥ अखेरचे दर्शन । अवघ्यांनी घेतले जाण । 'जय

स्वामी गजानन' । ऐसे मुखे बोलोनी ॥४५॥ मीठ अर्गजा अबीर । यांनी ती भरली गार । शिळा लावूनी केले द्वार । बंद भक्तांनी शेवटी ॥४६॥ दहा दिवसपर्यंत । समाराधना चालली तेथ । घेऊनी गेले असंख्यात । लोक स्वामींच्या प्रसादा ॥४७॥ खरोखरीच संतांचा । अधिकार तो थोर साचा । सार्वभौम राजाचा । पाड नाही त्यांच्या पुढे ॥४८॥ स्वस्ती श्रीदासगणूविरचित । हा गजाननविजय नामे ग्रंथ । भाविका दावो सत्पथ । भक्ति हरीची करावया ॥३४९॥ शुभं भवतु ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥

॥ इति एकोणविंशोऽध्यायः समाप्तः ॥